महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
Website - https://msbsvet.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०८६५५९४४८५१/५२/५३/५४

**परीपत्रक** का.क्र.०१/प्रवेश/२०२३/५०५
**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२३** दिनांक १०.०५.२०२३

विषय: प्रवेश सत्र ऑगस्ट २०२३ साठी प्रवेश वेळापत्रक...

१. मागील दोन-तीन वर्षात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे प्रवेश सत्र २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास विलंब झाला.

२. प्रवेश सत्र पूर्ण करण्यास झालेला विलंब तसेच प्रवेशाच्या अंतिम तारखेमध्ये देण्यात आलेली मुदत वाढ याचा थेट परिणाम प्रशिक्षणावर होतो. यामुळे प्रशिक्षणासाठी उपलब्ध असलेला कालावधी कमी झाल्याने प्रशिक्षणाच्या गुणवत्ता व तद्वतच विद्यार्थ्यांच्या कौशल्यावर विपरित परिणाम होत असतो.

३. सबब, प्रवेश सत्र ऑगस्ट २०२३ साठीची प्रवेश प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर प्रवेश प्रक्रिये दरम्यान सर्व कार्यवाही नियोजनबध्द पध्दतीने करण्याकरिता खालील प्रमाणे वेळापत्रक घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यवाही | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | ज्या संस्थांनी २०२२ ते २०२५ करिता नुतनीकरण घेतले नाही त्या संस्थांनी नुतनीकरण प्रस्ताव संबंधीत जिल्हा कार्यालयांकडे सादर करणे.<br>ज्या संस्थांना प्रशिक्षण वर्ष २०२२-२३ पासुन नव्याने शासन मान्यता प्राप्त झाली आहे, अशा संस्थांनी देखिल पुढील ३ वर्षांच्या नुतनीकरणासाठी संबंधीत जिल्हा कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे व नुतनीकरण शुल्क भरणे अनिवार्य आहे. | दि.१०.०५.२०२३ | दि.२५.०५.२०२३ |
| ०२ | जिल्हा कार्यालयांनी नुतनीकरण प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयांमार्फत मंडळास सादर करणे. | दि.१०.०५.२०२३ | दि.०५.०६.२०२३ |
| ०३ | प्रवेश सत्र ऑगस्ट २०२३ साठी संस्था निहाय उपलब्ध अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता यादी मंडळाव्दारे प्रसिध्द करणे. | दि.१०.०६.२०२३ | |

| अ.क्र. | कार्यवाही | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| ०४ | प्रवेश सत्र ऑगस्ट २०२३ साठी उमेदवारांची नोंदणी करणे (Registration) | दि.१०.०५.२०२३ | दि.३१.०७.२०२३ |
| ०५ | प्रवेशासाठी संस्थानिहाय अर्ज करणे | दि.१५.०६.२०२३ | दि.३१.०७.२०२३ |
| ०६ | संस्थांव्दारे प्रवेश निश्चित करणे | दि.१५.०६.२०२३ | दि.३१.०७.२०२३ |
| ०७ | प्रशिक्षण वर्ष २०२३-२४ साठी नियमित प्रशिक्षण सुरू करणे | दि.०१.०८.२०२३ | |
| ०८ | जिल्हा कार्यालयांव्दारे प्रवेश मान्यता देणे | दि.०१.०७.२०२३ | दि.३१.०८.२०२३ |

४. प्रवेशोच्छुक उमेदवारांकरिता सविस्तर प्रवेश वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

५. राज्यातील प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेश क्षमतांचा पूर्ण वापर व्हावा व प्रशिक्षणाच्या १००% जागा भरल्या जाव्यात या करीता "प्रवेश प्रोत्साहन अभियान" राबविण्यात यावे. या अभियानांतर्गत मंडळाच्या अभ्यासक्रमांची माहिती, शिकाऊ प्रशिक्षण योजना, रोजगार व स्वयंरोजगाराच्या उपलब्ध होणाऱ्या संधी, अभ्यासक्रमांची समकक्षता, उच्च शिक्षणाची संधी, इत्यादी बाबत माहिती प्रसार माध्यम व समाजमाध्यमांव्दारे प्रसिध्द करण्यात यावी. राज्यात आयोजित होणाऱ्या विविध मार्गदर्शन शिबिरे, समुपदेशन शिबिरे, रोजगार मेळावे, इत्यादी मध्ये संस्थांनी सहभाग घेऊन मंडळाच्या अभ्यासक्रमांची माहिती प्रवेशोच्छुक उमेदवार व पालकांना द्यावी.

६. प्रवेश प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करणे, प्रवेश पूर्ण क्षमतेने होणे, प्रशिक्षणाची गुणवत्ता उंचावणे व प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षण योजना, रोजगार, स्वयंरोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व संस्था, जिल्हा व प्रादेशिक कार्यालय यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

YOGESH SURESH PATIL
Digitally signed by YOGESH SURESH PATIL
Date: 2023.05.10 10:58:03 +05'30'

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

**प्रत: माहितीसाठी**

१. मा.प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२
२. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

**प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)
३. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था
४. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)